PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Ashtavinayak
Year: 1979

Song: Ashtavinayaka tujha mahima
Lyricist: Jagdish Khebudkar

अष्टविनायका तुझा महिमा कसा
अष्टविनायका तुझा महिमा कसा
दर्शनाचा लाभ घ्यावा भक्तांनी असा
दर्शनाचा लाभ घ्यावा भक्तांनी असा
अष्टविनायका तुझा महिमा कसा

गणपती पहिला गणपती आहा
गणपती पहिला गणपती आहा
मोरगावचा मोरेश्वर लई मोठं मंदिर
अकरा पायरी हो
हो अकरा पायरी हो
नंदी कासव सभामंडपी नक्षी सुंदर
शोभा साजरी हो
हो शोभा साजरी हो
मोरया गोसाव्यानं त्याचा घेतला वसा
आरं मोरया गोसाव्यानं त्याचा घेतला वसा
अष्टविनायका तुझा महिमा कसा

गणपती दुसरा गणपती आहा
गणपती दुसरा गणपती
थेऊर गावचा चिंतामणी
कहाणी त्याची लई लई जुनी
थेऊर गावचा चिंतामणी
कहाणी त्याची लई लई जुनी
काय सांगू
आता काय सांगू
डाव्या सोंडेचं नवाल केलं साऱ्यांनी
हो साऱ्यांनी
ईस्तार येचा केला थोरल्या पेशव्यांनी
हो पेशव्यांनी

रमाबाईला अमर केलं वृंदावनी
हो वृंदावनी
जो चिंता हरतो मनातली त्यो चिंतामणी
भगताच्या मनी...
भगताच्या मनी त्याचा अजूनी ठसा
अष्टविनायका तुझा महिमा कसा

गणपती तिसरा गणपती
गणपती तिसरा गणपती
सिद्धिविनायका तुझा सिद्धटेक गाव रं
पायावरी डोई तुझ्या भगताला पाव रं
सिद्धिविनायका तुझा सिद्धटेक गाव रं
पायावरी डोई तुझ्या भगताला पाव रं
ए हे ए हे आहा
हे दैत्य मधुकैटभानं गांजलं हे नगर
ईष्णुनारायण गाई गणपतीचा मंतर
राकुस मेलं नवाल झालं
टेकावरी देऊळ आलं
राकुस मेलं नवाल झालं
टेकावरी देऊळ आलं
लांबरूंद गाभाऱ्याला पितळेचं मखर
चंद्र सूर्य गरूडाची भवती कलाकुसर
मंडपात आरतीला खुशाल बसा
मंडपात आरतीला खुशाल बसा
अष्टविनायका तुझा महिमा कसा

गणपती गणपती गं चौथा गणपती
गणपती गणपती गं चौथा गणपती
बाई रांजणगावचा देव महागणपती
बाई रांजणगावचा देव महागणपती

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

दहा तोंड हिचं हात जणू मुर्तीला म्हणती
दहा तोंड हिचं हात जणू मुर्तीला म्हणती
गजा घालितो आसन डोळं भरून दर्शन
गजा घालितो आसन डोळं भरून दर्शन
सूर्य फेकी मुर्तीवर येळ साधून किरण
सूर्य फेकी मुर्तीवर येळ साधून किरण
किती गुणगान गावं किती करावी गणती
बाई रांजणगावचा देव महागणपती
पुण्याईचं दान घ्यावं
हे पुण्याईचं दान घ्यावं ओंजळ पसा
अष्टविनायका तुझा महिमा कसा

गणपती पाचवा पाचवा गणपती
गणपती पाचवा पाचवा गणपती
ओझरचा इघ्नेश्वर
बाई ओझरचा इघ्नेश्वर
लांबरूंद होई मुर्ती
जडजवाहीर त्याचं
काय सांगू शिरीमंती
ओझरचा इघ्नेश्वर
डोळ्यामंदी माणकं हो
डोळ्यामंदी माणकं हो
हिरा शोभतो कपाळा
तहान भूक हरती हो
सारा बघून सोहळा
चारी बाजू तटबंदी
मधी गणाचं मंदिर
ओझरचा इघ्नेश्वर
इघ्नहारी इघ्नहर्ता स्वयंभू जसा
इघ्नहारी इघ्नहर्ता स्वयंभू जसा
अष्टविनायका तुझा महिमा कसा

गणपती सहावा गणपती...
हो... हो...
लेण्याद्री डोंगरावरी नदीच्या तीरी
गणाची स्वारी
तयाला गिरिजात्मज हे नाव
दगडामंदी कोरलाय भक्तिभाव
जमती इथे रंका संगती राव
हे... जी जी
जमती इथे रंका संगती राव
हे... जी जी
जमती इथे रंका संगती राव
हे... जी जी
खडकात केलं खोदकाम
खडकात केलं खोदकाम
दगडात मंडपी खांब
दगडात मंडपी खांब
वाघ सिंह हत्ती लई मोठं
दगडात भव्य मुखवटं
गणेश माझा पुत्र असावा
ध्यास पार्वतीचा
ध्यास पार्वतीचा
ध्यास पार्वतीचा
आणि गिरिजात्मज हा
तिनं बनवला पुतळा मातीचा
जी जी रं जी रं हे जी
जी जी रं जी रं हे जी
जी जी रं जी रं हे जी
हे हे हे हे हे हे हे हे...
दगडमाती रूप देवाचं
अरे दगडमाती रूप देवाचं लेण्याद्री जसा
अष्टविनायका तुझा महिमा कसा

सातवा गणपती राया
सातवा गणपती राया
सातवा गणपती राया
हे हे हे हे
हे हे हे हा...
महड गाव अती महसूर
वरदविनायकाचं तिथं एक मंदिर
मंदिर लई साधंसुधं जसं कौलारू घर
घुमटाचा कळस सोनेरी
नक्षी नागाची कळसाच्यावर
कळसाच्यावर हे हे हे हे हे...
सपनात भक्ताला कळं
देवळाच्या मागं हाय तळं
मुर्ती गणाची पाण्यात मिळं
त्यानं बांधलं तिथं देऊळ
दगडी महिरप सिंहासन
या प्रसन्न मंगलमुर्ती हो
वरदानाला विनायकाची
पूजा कराया येती हो
जी जी रं जी
माझ्या गणा रं जी जी
माझ्या गणा रं जी जी
माझ्या गणा रं जी जी
हे हे हे हे हे हे हे हे...
चतुर्थीला गर्दी होई रात्रंदिवसा
अहो चतुर्थीला गर्दी होई रात्रंदिवसा
अष्टविनायका तुझा महिमा कसा
आठवा आठवा गणपती आठवा
गणपती आठवा हो गणपती आठवा
पाली गावच्या बल्लाळेश्वरा
आदिदेव तू बुद्धीसागरा
पाली गावच्या बल्लाळेश्वरा
आदिदेव तू बुद्धीसागरा
स्वयंभू मुर्ती पूर्वाभिमुख
सूर्यनारायण करी कौतुक
स्वयंभू मुर्ती पूर्वाभिमुख
सूर्यनारायण करी कौतुक
डाव्या सांडेचे रूप साजिरे
कपाळ विशाळ डोळ्यात हिरे
डाव्या सांडेचे रूप साजिरे
कपाळ विशाळ डोळ्यात हिरे
चिरेबंद या भक्कम भिंती
देवाच्या भक्तिला कशाची भीती
चिरेबंद या भक्कम भिंती
देवाच्या भक्तिला कशाची भीती
ब्रम्हानंदी जीव होई वेडा की पिसा
ब्रम्हानंदी जीव होई वेडा की पिसा
अष्टविनायका तुझा महिमा कसा
अष्टविनायका तुझा महिमा कसा
दर्शनाचा लाभ घ्यावा भक्तांनी असा
दर्शनाचा लाभ घ्यावा भक्तांनी असा
अष्टविनायका तुझा महिमा कसा
अष्टविनायका तुझा महिमा कसा
मोरया मोरया मंगलमुर्ती मोरया

Literacy for a Billion

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*